रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

## सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती नवीन व नुतनीकरण अर्ज २०२५-२६

## बी.कॉम. / एम.कॉम. / बी.बी.ए. (सी.ए.)

## अंतीम मुदत - ३१/१०/२०२५

दि. २२/०७/२०२५

फेब्रुवारी २०२५ मध्ये इयत्ता १२ वीत उत्तीर्ण झालेल्या सिनिअर महाविद्यालयातील प्रथम वर्ष वर्गातील पात्र सर्व विद्यार्थ्यांना नवीन सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती अर्ज भरता येईल. महाविद्यालयाच्या वेबसाईटवर फेब्रुवारी २०२५ मध्ये इ. १२ वी उत्तीर्ण झालेल्या पात्र विद्यार्थ्यांची यादी आणि शासन परिपत्रक अपलोड केलेले आहे. तसेच मागील वर्षी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती मिळणाऱ्या विद्यार्थ्यांनी परिपत्रक वाचून किमान ५० टक्के गुणांसह सर्व विषयात उत्तीर्ण असणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनीच अर्ज नुतनीकरण करावा. विद्यार्थ्यांना नवीन अर्ज भरण्यासाठी व नुतनीकरण करण्यासाठी **अंतीम मुदत दि. ३१.१०.२०२५** अशी आहे. विद्यार्थ्यांनी शासनाने दिलेल्या अंतीम दिनांकाच्या आत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती अर्ज भरुन सर्व कागदपत्र जोडून महाविद्यालयात जमा करावा.

**मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही यांची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच SC/OBC/SBC/VJNT/ST/OEPN/Handicap कॅटेगिरीतील विद्यार्थ्यांना सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती किंवा त्यांनी प्रवेश घेतलेल्या कॅटेगिरीचा शिष्यवृत्ती अर्ज या दोन पैकी एकच शिष्यवृत्ती अर्ज भरता येईल. दोन शिष्यवृत्ती अर्ज भरता येणार नाही.** सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची पेईंग फी प्रमाणे फी भरावी लागेल याची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. **तसेच शासन परिपत्रकानुसार ATKT रिजल्ट असणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज नुतनीकरण करता येणार नाही.**

**अर्ज ऑनलाईन भरताना फक्त ओरिजनलच कागदपत्र अपलोड करावे झेरॉक्स अपलोड करु नये. शिष्यवृत्ती अर्जास खालील कागदपत्रांची झेरॉक्स प्रत दिलेल्या नंबरनुसार सेल्फ अटेस्टेड करुन जोडावीत.**

अर्ज नुतनीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सोबतचे शासनाचे परिपत्रक वाचून पात्र असल्यासच अर्ज नुतनीकरण करावा किंवा काही शंका असल्यास शिष्यवृत्ती विभागातून माहिती घ्यावी. **तसेच विनाअनुदानित (Non-Grant) तुकडीत प्रवेश असलेल्या विद्यार्थ्यांनी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती अर्ज भरु नये.**

**विद्यार्थ्यांनी खालील प्रमाणे अर्जाबरोबर कागदपत्रे सेल्फ अटेस्टेड करुन जोडून द्यावयाची आहे.**

१. ऑनलाईन भरलेला अर्ज.

२. ऑनलाईन बोनाफाईड

३. महाविद्यालय व्हेरिफिकेशन अर्ज.

४. शाळा सोडल्याचा दाखला व महाविद्यालयाचा दाखला

५. डोमासाईल सर्टिफिकेट

६. रेशन कार्ड झेरॉक्स

७. आधार कार्ड झेरॉक्स

८. आधार कार्ड लिंक फॉर्म

९. सन २०२५-२६ मधील प्रवेश पावती.

१०. वडीलांचा वार्षिक उत्पन्नाचा सन २०२४-२५ चा दाखला. उत्पन्न ४.५० लाख रु.च्या आत. **(ओरिजनल उत्पन्न दाखला तहसिलदार यांचेकडील )** वडील हयात नसल्यास आईच्या नावाचा उत्पन्न दाखला जोडून वडीलांचा मृत्यु दाखला जोडावा तसेच आई-वडील विभक्त राहत असल्यास त्या संबंधी कागदपत्र जोडावे. )

११. दहावी व त्या पुढील सर्व गुणपत्रक

१२. जातीचा दाखला (कॅटेगिरीतील विद्यार्थ्यांसाठी )

१३. बँक पासबुक

Chandraroop Dakale Jain College of Commerce Shrirampur

प्राचार्य,
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
श्रीरामपूर

**www.cdjcollege.com**

सदर सूचना महाविद्यालयाच्या वेबसाईटवर देखील टाकण्यात आलेली आहे.